दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-३०८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, ३० एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

लोकसभा उमेदवारांच्या पेड न्यूज बातम्यांवर राहणार वॉच

केंद्रीय खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांचे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश

■ ठाणे, यश सावंत :

येत्या एखाददोन दिवसात लोकसभा मतदार संघातील उमेदवारांच्या उमेदवारी अर्जांसोबतच लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होणार आहे. अशात केंद्रीय खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांची कल्याण लोकसभा मतदार संघ कार्यालयास भेट दिली असून त्यांनी उमेदवारांच्या पेड न्यूज बातम्यांवर वॉच ठेवण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. सोशल मीडियावर दैनंदिन स्वरुपात प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांचे निरीक्षण करुन सदर बातम्या पेड न्यूज असतील तर तो खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात लावणेबाबतच्या सूचना नकुल अग्रवाल यांनी यावेळी दिल्या. केंद्रीय खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांनी डोंबिवली (पू.) येथील २४- कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांच्य कार्यालयास भेट दिली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते व १४४ -कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी त्यांचे स्वागत केले. नकुल अग्रवाल यांनी खर्चविषयक पथकातील अधिकारी वर्गाची बैठक घेऊन त्यांना निवडणूकीच्या कामकाजाविषयी मार्गदर्शन केले. प्रामुख्याने FST(भरारी पथक), SST(स्थिर सनियंत्रण चमू)पथकांनी दक्षतेने काम करण्याबाबत सूचना त्यांनी यावेळी दिल्या.तसेच खर्चाच्या नोंदी अदययावत ठेवणेबाबतच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिका-यांना दिल्या. याप्रसंगी लोकसभा खर्च पथक प्रमुख तथा उल्हासनगर महानगरपालिकेचे मुख्यलेखाधिकारी किरण भिलारे,सहाय्यक खर्च निरीक्षक तथा मुख्यलेखा परीक्षक शरद देशमुख,कल्याण लोकसभा मतदार संघासाठी खर्च विषयक बाबींचे कामकाज बघणेकामी नियुक्त समन्वय अधिकारी दिलीप सूर्यवंशी,कल्याण महापालिकेचे उपायुक्त प्रसाद बोरकर उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते प्रचार यंत्रणाचा शेवटचा दिवस तसेच २० मे रोजीचे मतदान व मतमोजणीच्या ४ जून पर्यंत उमेदवारांना ९५ लाख रुपये खर्च करण्याची मयार्दा निश्चित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री केजरीवाल यांचं तुरुंगातूनसुद्धा दिल्ली सरकारच्या योजनांकडे लक्ष आहे : आतिशी मार्लेना

दिल्ली सरकारमधील मंत्री आतिशी मार्लेना यांनी तिहार तुरुंगात जाऊन केजरीवाल यांची घेतली भेट

■नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

दिल्लीतल्या आम आदमी पार्टीच्या सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात दिल्लीतल्या महिलांना दर महिन्याला १,००० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून अरविंद केजरीवाल यांच्यामागे सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) चौकशीचा ससेमिरा लागला होता. त्यातच केजरीवाल यांना गेल्या महिन्यात २१ मार्च रोजी ईडीने अटक केली. त्यामुळे अनेक सरकारी योजना प्रलंबित आहेत. तसेच राज्याच्या कारभारात अनेक अडचणी येत आहेत. दरम्यान, केजरीवाल तुरुंगात असल्याने दिल्ली सरकारचं वीज आणि पाण्यावरील अनुदान (सबसिडी) आणि महिलांचा बसमधून होणारा मोफत प्रवास बंद होणार असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. सरकारी योजना आणि अनुदान बंद होणार असल्याच्या अफवा पसरू लागल्यानंतर दिल्ली सरकारने अधिकृत निवेदन जारी करत म्हटलं आहे की, कोणतीही योजना किंवा अनुदान बंद केलं जाणार नाही. यावरून स्पष्ट झालं आहे की, दिल्ली सरकार पाणी आणि वीजेवरील अनुदान बंद करणार नाही. तसेच दिल्लीतल्या महिला डीटीसी बसमधून मोफत प्रवास करू शकतात. यासह इतर योजनादेखील चालू राहतील. दरम्यान, दिल्ली सरकारमधील मंत्री आतिशी मालेर्ना यांनी सोमवारी (२९ एप्रिल) तिहार तुरुंगात जाऊन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. या भेटीनंतर आतिशी म्हणाल्या, केजरीवाल यांना तुरुंगातही दिल्लीतल्या जनतेची चिंता आहे. मी त्यांना विचारलं की, ते कसे आहेत? त्यावर ते म्हणाले, तुम्ही माझी काळजी करू नका, माज्या आरोग्याची देखील काळजी करू नका. दिल्ली सरकारचं काम कसं चाललंय ते सांगा. शाळेतल्या मुलांना वेळेवर पुस्तकं मिळतायत का? विद्यार्थ्यांचं शिक्षण वेळेवर चालू आहे ना? शाळांमध्ये कुठलीही अडचण नाही ना? मोहल्ला क्लिनिकमध्ये औषधं वेळेवर पोहोचतायत की नाही? अनेक ठिकाणांहून तक्रारी येत होत्या की, मोहल्ला क्लिनिकमध्ये पुरेशी औषधं नाहीत. ती समस्या आपण सोडवली का? उन्हाळा वाढलाय त्यामुळे दिल्लीत पाण्याची समस्या निर्माण झाली असेल कुठेही पाणी कमी पडता कामा नये. आतिशी म्हणाल्या, केजरीवाल यांचं तुरुंगातून दिल्ली सरकारच्या योजनांकडे लक्ष आहे. त्यांनी तुरुंगातून दिल्लीतल्या महिलांना एक संदेश पाठवला आहे. ते म्हणाले, मी लवकरच तुरुंगाबाहेर येईन आणि दिल्लीतल्या महिलांना दर महिन्याला १,००० रुपये देण्याचं वचन पूर्ण करेन.

इतिहास संशोधक सदाशिव टेटविलकर लिखित 'सह्याद्री परिक्रमा' या पुस्तकाचे शिवसमर्थ विद्यालयाच्या सभागृहात प्रकाशन

■ठाणे, विशाल पाटील:

सह्याद्री परिक्रमा सगळेच करतात पण या सह्याद्रीकडून आपण काय घेतो? असा प्रश्न उपस्थित करत किल्ल्यांची वाताहत होत असल्याची खंत शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त गियारोहक प्रदीप केळकर यांनी व्यक्त केली. सह्याद्रीने माणुसकी शिकवली, अनेक माणसे जोडली. किल्ल्यावर जाणारे प्लास्टीकचा कचरा करतात पण अनेक सेवाभावी संस्था प्लास्टीकमुक्त मोहीम येथे राबवत असल्याचे आहेत. या मोहीमांमुळे पुन्हा तो गड जीवंत होतो. किल्ल्याचे स्वरुप दयनीय झाले आहे पण सरकारला दोष देण्यापेक्षा तो किल्ला स्वच्छ ठेवणे ही आपली देखील जबाबदारी आहे. किल्ले हा महाराजांनी दिलेला ठेवा आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. शिवसमर्थ विद्यालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या इतिहास संशोधक सदाशिव टेटविलकर लिखित व श्रीकृपा प्रकाशन प्रकाशित 'सह्याद्री परिक्रमा' या पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी केळकर यांनी वरील विधान केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात उद्योजक रविंद्र प्रभुदेसाई म्हणाले की, सह्याद्रीचे अभेद्य कवच असल्यामुळेच इथल्या पर्यावरणाची जपणूक झाली व निसर्गसंपन्नता वाढली. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांनी छत्रपती शिवरायांना स्वराज्य निर्मितीचे स्वप्न साकारण्यात बहुमोल योगदान दिले. ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बल्लाळ म्हणाले की, इतिहासात रमण्यापेक्षा त्यातून बोध घेतला पाहिजे. इतिहास हा विषय माकार्पुरता मयार्दीत राहू नये. ठाण्यात वस्तुसंग्रहालय उभे राहणे गरजेचे असून त्यादृष्टीने आपण प्रयत्नरत असल्याचे सांगत नव्या पिढीला इतिहासाची ओळख करून देणे ही पालकांची जबाबदारी असून त्यांनी मुलांना मॉलऐवजी म्युझियमची सफर घडवावी असा पर्याय त्यांनी सांगितला. आनंद विश्व गुरूकुलचे अध्यक्ष विलास ठुसे यांनी ५० वर्षांपासूनच्या टेटविलकरांशी असलेल्या मैत्रीच्या आठवणींचा पट खुला करीत साधेपणा आणि सहनशीलता हा त्यांचा महत्वाचा गुण असल्याचे सांगितले. सुरूवातीला टेटविलकर यांनी आपल्या मनोगतात १९८३ मध्ये चार मित्रांसह केलेल्या सह्याद्री परिक्रमेच्या आठवणी सांगताना दुर्गप्रेमी गो.नी.दांडेकर यांचे आशीर्वाद आणि धर्मवीर आनंद दिघे यांचा प्रोत्साहक वरदहस्त याचा विशेष उल्लेख केला. सीमा टेटविलकर - कोंडे यांनी भावना व्यक्त करताना आपल्या वडिलांनी केलेल्या साधेपणाच्या संस्कारांचा आवर्जुन उल्लेख करीत त्यामुळे जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन आपसुक तयार झाला आणि कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची जडणघडण होत गेली.

समाजकारणातून देशाची स्थिरता कायम ठेवण्यासाठी नेहमीचं माझे प्रयत्न राहणार : उज्ज्वल निकम

■ मुंबई, विशाल कारंडे:

मी अजून प्रचाराला सुरुवात केली नाही. पण काही व्यक्तींनी समाजमाध्यमांवर टीका करायला सुरुवात केली. फौजदारी क्षेत्रात वकिली करताना अनेक गुन्हेगारांना फासावर पाठवलं आहे. गुन्हेगारांकडून अनेक आरोप व्हायचे. परंतु अशा आरोपांना मी उत्तर दिले नाही. तसेच राजकारणात एकाने टीका केली म्हणून दुसऱ्याने उत्तर द्यायचे हा माझा उद्योग नाही. मला सकारात्मक कामे करायची आहे. या मतदारसंघातील जटील प्रश्न कसे सोडवता येतील, राजकारणातून समाजकारण आणि समाजकारणातून देशाची स्थिरता कायम ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सहाय्य करण्यासाठी माझे प्रयत्न राहणार आहे अशा शब्दात उज्ज्वल निकम यांनी विरोधकांना टोला लगावला. वांद्रे येथील सभेत उज्ज्वल निकम म्हणाले की, भाजपाचे मुंबई अध्यक्ष हे वयाने लहान असले तरी राजकारणातील अनुभव खूप मोठे आहेत. राजकारणात मला भाषणाची सवय नाही. पण काहीही चुकले तरी ती चूक दाखवून दिली तर मी दुरुस्त करेन. विरोधकांनी माज्यावर टीका करावी पण अकारण मला छेडण्याचा प्रयत्न करू नये. मला कठोर भाषा वापरता येते. ज्यांनी माझा युक्तिवाद ऐकला असेल त्यांना ते माहिती असावी. आपल्या देशाचे पंतप्रधान म्हणतात, मी सेवक आहे तसेच मी या मतदारसंघाचा सेवक राहीन, अडीअडचणीत माझा फोन नंबर सगळ्यांना दिलेला आहे. राजकारण वाईट हे सांगणारे महाभागही मला भेटले. राजकारणातूनही चांगले काम करता येते, जनतेच्या अडचणीत त्यांच्या मदतीला धावू शकता. त्या भावनेतून मी राजकारणात आलो असं त्यांनी सांगितले. तसेच जातीय सलोखा टिकला पाहिजे, धार्मिक वाद होऊ नये यासाठी बाबासाहेब आंबेडकरांचा कटाक्ष होता. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या संचालक मंडळात ७ दलित आणि ४ इतर असतील असं त्यात तरतूद आहे. आपल्याला समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जायचं आहे. ही घटना बदलली जाणार आहे असा काही प्रचार करतात पण घटना कधीही बदलली जाणार नाही. काहीवेळा बोगस प्रचार केला जातो. भीतीचा बागुलबुवा निर्माण केला जातो असंही विरोधकांच्या टीकेला निकम यांनी प्रत्युत्तर दिले. दरम्यान, भारताची राज्यघटना ही जगात सर्वोत्तम आहे. सुप्रीम कोटार्तील न्यायनिवाडे उदाहरण म्हणून आम्हीही वापरतो असं कौतुक पाकिस्तानच्या ॲटर्नी जनरलनं केले होते. त्यामुळे भारताची घटना बदलणार ही चुकीचा भ्रम मनातून काढून टाका. माझं राजकीय भाषण नाही, जे बोलतो ते हृदयापासून बोलतो. न्यायालयातील उज्ज्वल निकम तुम्ही पाहिले असतील परंतु तुमचा लोकप्रतिनिधी म्हणून हा उज्ज्वल निकम संसदेत तितक्याच तत्परतेने काम करेल अशी खात्री देतो असा विश्वास उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केला.

राज्यात पुढील ४ दिवसांत उष्णतेची लाट येणार

मे महिन्याचा पहिला आठवडा ठरणार 'ताप'दायक

■ पुणे, सचिन कदम:

गेल्या आठवडाभरापासून राज्यातील कमाल आणि किमान तापमानात मोठी वाढ झाली आहे. अनेक भागात उन्हाचे चटके जाणवत आहे. त्यामुळे कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या नागरिकांची चांगलीच घामाघूम होत आहे. उकाड्यामुळे घशाला सारखी कोरड पडत आहे. अशातच राज्यात येत्या तीन ते चार दिवसात उष्णतेची लाट येणार, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात राज्यांतील काही भागात उष्णतेची लाट येणार असल्याचं हवामान खात्याने सांगितलं आहे. असह्य करणारा उन्हाचा चटका उष्माघात ठरू शकतो. त्यामुळे काम असेल तर घराबाहेर पडा, असं आवाहन हवामान खात्याने केलं आहे. सध्या हवामानात मोठे बदल होत असून गुजरातमधून येणारी उष्ण हवा कोकण, उत्तर- मध्य महाराष्ट्रात येत आहे, तसेच कमी पाऊस, कोरडी माती, एल निनोचा प्रभाव, वाऱ्याच्या खंडिततेचा परिणाम यामुळे कमाल तापमान वाढत आहे.

त्यातच वातावरणातील खालच्या थरातील द्रोणिका रेषा आज पूर्व विदभार्पासून उत्तर केरळपर्यंत, मध्य महाराष्ट्र कर्नाटकावरून जात आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत कोकण- गोव्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. या भागात यलो अलर्ट देण्यात आला आहे. ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यासह मुंबईत उष्ण आणि दमट वातावरण राहणार आहे. पुणे शहरातील तापमानात देखील वाढ होण्याची शक्यता आहे. सकाळी ११ ते सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत उन्हाचा चटका अधिक जाणवेल. त्यामुळे आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नये, असा सल्ला नागरिकांना देण्यात आलाय.

दरम्यान, एकीकडे उन्हाचा कडाका वाढत असताना दुसरीकडे पुढील दोन दिवसांत मराठवाडा आणि विदभार्तील काही भागांत मेघगर्जनेसह अवकाळी पावसाची शक्यता वर्तविली आहे. त्यानंतर राज्यातील हवामान कोरडे राहणार असून, कमाल तापमान वाढणार असल्याने उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

कोरोना संकटानंतर नवीनच धोका निर्माण ! जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

■ पुणे, अभिजित येरल्लू:

करोना संकटाच्या काळात डॉक्टरांकडून प्रतिजैविकांचा अतिवापर करण्यात आला. अनेक रुग्णांना आवश्यक नसतानाही प्रतिजैविके देण्यात आली. जगभरात सरासरी चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. यामुळे आता प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या जगभरात जाणवू लागली आहे, असा निष्कर्ष जागतिक आरोग्य संघटनेने काढला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने ६५ देशांतील रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या ४ लाख ५० हजार करोना रुग्णांच्या आरोग्य अहवालाची तपासणी केली. हे रुग्ण जानेवारी २०२० ते मार्च २०२३ या कालावधीतील आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, करोना संकटाच्या काळात रुग्णालयात दाखल झालेल्या केवळ ८ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्याची गरज होती. प्रत्यक्षात डॉक्टरांकडून जगभरात सरासरी ७५ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली.

पश्चिम प्रशांत विभागात ३३ टक्के रुग्णांना तर आखाती आणि आफ्रिकी देशांमध्ये ८३ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. युरोप आणि अमेरिकेत २०२० ते २०२२ या कालावधीत प्रतिजैविके देण्यात प्रमाण हळूहळू कमी झाले. मात्र, आफ्रिकेत ते वाढताना दिसून आले.

प्रतिजैविकांचा सर्वाधिक वापर करोनामुळे गंभीर स्थिती झालेल्या रुग्णांमध्ये झाला. जगभरात अशा ८१ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. मध्यम अथवा सौम्य त्रास असलेल्या करोना रुग्णांना प्रतिजैविके देण्याचे प्रमाण विभागनिहाय वेगळे असून, त्यात आफ्रिकेत सर्वाधिक ७९ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. विशेष म्हणजे, प्रतिजैविके देण्यात आल्याने करोना रुग्णांच्या प्रकृतीत फरक पडला नाही. याउलट जीवाणूसंसर्ग नसलेल्या रुग्णांच्या आरोग्याला त्यामुळे अपाय झाला, असे संघटनेने नमूद केले आहे.

लेव्हीप्रश्नी तोडगा न निघाल्यास १ मे पासून माथाडी कामगार युनियन आंदोलन करणार

■ नाशिक, नितीन देवळेकर :

महिनाभरापासून जिल्ह्यातील बाजार समित्या लेव्हीच्या मुद्द्यावरून कुलूपबंद असल्याने कोट्यवधी रुपयांची दैनंदिन उलाढाल ठप्प झाली आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी कांदा व्यापाऱ्यांनी खासगी मार्केट सुरू केल्याने कष्टकरी माथाडी कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

हाताला काम नसल्याने कुटुंबाची गुजराण कशी करायची, असा प्रश्न कामगारांना पडला आहे. याबाबत तोडगा न निघाल्यास कामगार दिनापासून (ता. १) बाजार समित्यांचे प्रवेशद्वार व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा माथाडी कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

बाजार समितीमधील कांद्याचे लिलाव महिनाभरापासून बंद आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी काही ठिकाणी कांदा व्यापाऱ्यांनी पुढाकार घेवून खासगी मार्केट सुरू केले आहेत. त्यामुळे सदर व्यापाऱ्यांकडे कामगार कायद्यान्वये कामाची मागणी करूनही व्यापाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार पदाधिकाऱ्यांनी केली आहे. कांदा व्यापारी कांदा खरेदी-विक्री प्रक्रियेत माथाडी कामगारांना सोयीस्कररित्या बाजूला सारल्यामुळे व्यापारी आणि माथाडी कामगारात संघषार्ची ठिणगी पडली आहे.

नाशिक जिल्हा माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार कायद्यानुसार खासगी मार्केट व व्यापाऱ्यांच्या आस्थापनेत माथाडी स्वरूपाच्या कामासाठी मंडळाची योजना लागू होते. त्यानुसार खासगी मार्केटच्या आवारात व व्यापाऱ्यांच्या खासगी जागेत माथाडी स्वरुपाची हमाली, तोलाई आदी कामे मंडळाच्या नोंदीत माथाडी कामगारांकडून करून घेणे माथाडी कायद्यान्वये बंधनकारक आहे.

परंतु, जिल्ह्यातील खासगी मार्केटमध्ये मंडळाच्या नोंदीत माथाडी कामगारांव्यतिरिक्त इतरांकडून करून घेण्यात येत असल्याच्या तक्रारी माथाडी युनियनने कामगार उपायुक्तांकडे केल्या आहेत.

कल्याण मुरबाड रेल्वेच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध

■ ठाणे, रोहित जैसवाल :

कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाच्या आंबिवली मानिवली येथील भूसंपादनास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला. या प्रकल्पासाठी जमिनी देण्यास शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतरही या विरोधाला न जुमानता रेल्वेने भूसंपादन करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करत स्थानिक नागरिकांनी गोंधळ घातला. यानंतर ज्या शेतकऱ्यांचा सर्व्हेक्षणस विरोध आहे त्या शेतकऱ्यांच्या जमिनी वगळून उर्वरित जमिनीची मोजणी करण्याचा सुवर्णमध्य पोलिसांनी काढला. तरी या शेतकऱ्यांची रेल्वे प्रशासनाकडून कशा प्रकारे समजूत काढली जाणार यावर या प्रकल्पाचे भवितव्य अवलंबून आहे.

कल्याण मुरबाड रेल्वेच्या प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून आता लोकसभा निवडणूक आचार संहितेच्या काळात रेल्वेकडून या जमिनीचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे. उल्हास नदी किनारच्या सरकारी जागेतून रेल्वे मार्गिका बनविणे शक्य असतानाही शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरविण्याचा रेल्वे प्रशासनाचा प्रयत्न असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी करु लागले आहेत.

रेल्वेच्या या प्रकल्पात मानिवली मधील १९७० गुंठे भूखंड बाधित होत असून यात २० घरे, अडीच हजार फळझाडे आणि ३ ते साडे तीन हजार जंगली झाडे तोडली जाणार आहेत. यामुळे आमच्या जमिनीवरून रेल्वे नको अशी स्थानिक नागरिकाची भूमिका आहे. या जवळपास ५० ते ६० शेतकऱ्यांनी आपला लेखी विरोध भूसंपादन विभागासह संबधित यंत्रणाकडे नोंदवला आहे. मात्र शेतकऱ्यांच्या विरोध दुर्लक्षित करून रेल्वेच्या बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता शुभांगी पाटील यांनी त्यांचे पथक सर्व्हेक्षणासाठी मानिवली परिसरात दाखल केले.

या वेळी स्थानीक शेतकऱ्यांनी या पथकाला गराडा घालत विरोध केला. यामुळे स्थानिक पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी उपस्थित शेतकऱ्यांना त्यांची भूमिका विचारली असता काही शेतकऱ्यांनी आपला विरोध नसून आपण रेल्वेला भूखंड देण्यास तयार असल्याचे सांगितले तर काही शेतकऱ्यांनी विरोध केला.

यानंतर पोलिसांनी सुर्वण मध्य काढताना जे शेतकरी आपल्या जमिनी देण्यास तयार आहेत त्यांच्या जमिनीचे सर्वेक्षण करून त्याचा मोबदला रेल्वेने निश्चित करावा उर्वरित शेतकऱ्यांशी प्रथम चर्चा करून तोडगा काढावा त्यानंतरच सर्व्हेक्षण केले जावे अशा सूचना रेल्वेच्या अधिकाऱ्यांना केल्यानंतर रेल्वेकडून निम्म्या जमिनीचा सर्व्हे करण्यात आला.

रेल्वे प्रशासनाकडून उर्वरित शेतकऱ्यांची कशाप्रकारे समज घातली जाते? या शेतकऱ्यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावल्यास न्यायालय त्यावर काय निर्णय देते यावर कल्याण मुरबाड रेल्वेच्या कामाचा वेग अवलंबून असणार आहे. यामुळे या शेतकऱ्यांची रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर मनधरणी करण्या बरोबरच जिथे शक्य आहे तिथे नदी किनारी मोकळ्या भूखंडाचे संपादन करून शेतकर्याच्या जमिनी बाधीत न करता हा प्रकल्प मार्गी लावला जावा अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

ठाकरेंचे आमदार, खासदारही शिंदेंच्या संपर्कात रत्नागिरीतील सभेवरून उदय सामंतांचा दावा

■ रत्नागिरी, दिगंबर जाधव :

रत्नागिरी शहरामध्ये रविवारी ठाकरे गटाची सभा झाली. या सभेला जास्त लोक न आल्याचा दावा निलेश राणे आणि मंत्री उदय सामंत यांच्याकडून केला जात आहे. यावरून सामंत यांनी ठाकरे गटाकडे १३ आमदार आहेत त्यातील ५-६ आमदार एकनाथ शिंदेंच्या संपर्कात आहेत, असा दावा केला आहे.

रत्नागिरी शहरामध्ये महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचाराचा सभा प्रभागनिहाय झाल्या आहेत. प्रत्येक सभेला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या तोडीचे मताधिक्य रत्नागिरी जिल्हा नक्की देईल. नारायण राणे यांना लोकसभेत नक्की पाठवू, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

रविवारी एक कॉर्नर सभा झाली त्या सभेची परिस्थिती पाहिली तर तेथे किती खुर्चा होत्या असा सवाल करत रत्नागिरीत आल्यानंतर कोकणच्या विकासासाठी काय करणार आहोत हे मुद्दे आवश्यक होते परंतु रिफायनरीला आमचा विरोध राहील अशा प्रकारचे वक्तव्य करण्यात आले, असा टोला सामंत यांनी लगावला.

केंद्र शासनाला रिफायनरी व्हावी यासाठी एकीकडे पत्र देता. तुमचे आमदार रिफायनरीला समर्थन देतात तर खासदार विरोध करतात. नक्की तुमची भूमिका काय आहे? असा सवाल सामंत यांनी ठाकरेंकडे उपस्थित केला.

ठाकरे गटाकडे १३ आमदार आहेत त्यातील ५-६ आमदार एकनाथ शिंदेंच्या संपर्कात आहेत, २-३ खासदार आहेत ते पण संपर्कात आहेत, असेही सामंत म्हणाले. आज किंवा उद्या शिवसेनेच्या उर्वरित जागांवरील उमेदवार एकनाथ शिंदे जाहीर करतील, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

खारफुटीवरील भरावप्रकरणी सिडको, वन विभाग येणार अडचणीत

■ नवी मुंबई, भावना जैन:

नवी मुंबईतील पाम बीच मार्गावरील एनआरआय आणि टीएस चाणक्य पाणथळींच्या परिसरात पर्यावरणप्रेमींनी वारंवार तक्रारी करूनही भूमाफियांनी नवी मुंबई महापालिका आणि सिडकोशी संगनमत करून खारफुटीची कत्तल करून भराव टाकणे सुरूच ठेवले आहे. याबाबत पर्यावरणप्रेमींनी पुन्हा तक्रार केल्यानंतर सोमवारी ठाण्याच्या तहसीलदारांच्या पथकाने पाहणी करून खारफुटीची कत्तल आणि भरावप्रकरणी जमीनमालकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

येथील बहुतांश जमीन ही सिडको आणि वन विभागाच्या मालकीची असल्याने तहसीलदारांच्या आदेशामुळे हे दोन्ही विभाग अडचणीत येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सोमवारी दुपारी ठाणे तहसीलदार दिनेश पैठणकर यांनी बेलापूरचे मंडल अधिकारी सुरेश रोकडे, बेलापूरचे तलाठी ईश्वर जाधव, सिडको, नवी मुंबई महापालिका, पोलिस विभागाच्या प्रतिनिधींसह वन विभागाचे महेंद्र गिते व संदीप रोकडे यांच्यासोबत ही पाहणी केली. यावेळी मँग्रोव्ह सेलचे प्रतिनिधीही हजर होते.

नवी मुंबईतील पर्यावरणप्रेमी सुनील अग्रवाल आणि अधिवक्ता प्रदीप पाटोळे यांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या होत्या. यात एनआरआय वेटलँडवर आंतर-भरती-ओहोटीच्या पाण्याचे अडथळे राष्ट्रीय वेटलँड ॲटलसचा भाग असल्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने संरक्षित केलेली ओलसर जमीन असून या पाणथळींच्या संरक्षणासाठी कुंपण न लावता ९ पीबीआरचे बांधकाम करावे, सर्व्हे क्रमांक २२ मधील खारफुटीचे सिडकोने मँग्रोव्ह सेलकडे हस्तांतरण करावे, टीएस चाणक्य पाणथळीत पुन्हा १० ते १५ खारफुटीची झाडे नव्याने तोडल्याची तक्रार असून तत्पूर्वी कापलेली १२५ झाडे पुन्हा वाढू नयेत म्हणून त्यांच्यावर रसायने टाकल्याचा आरोप आहे. यावेळी टीएस चाणक्य वेटलँड जवळील खारफुटीवर टाकलेले सौर दिवे आणि डेब्रीज महापालिकेने आधीच काढून टाकल्याचे पाहणी पथकाच्या निदर्शनास आले.

येथील पाणथळींवर नवी मुंबई महापालिकेने आपल्या प्रारुप विकास आराखड्यात निवासी आणि वाणिज्यिक बांधकामांची परवानगी दिली आहे. तर परिसरात ठाणे खाडी फ्लेमिंगों अभयारण्याचा भाग असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. तसेच वन विभाग आणि सिडकोने हा परिसर मँग्रोव्ह सेलकडे हस्तांतरित करण्याची त्यांची मागणी आहे. शिवाय महापालिकेने त्याची देखभाल आणि संवर्धन करण्याची त्यांची मागणी आहे.

अनशापोटी करा गुळाचे सेवन

अनशापोटी गूळ खाल्ल्यास ४ फायदे होतात. आपल्यापैकी बहुतेक लोक रात्री जेवल्यानंतर गूळ खातात. त्यामुळे जेवण पचण्यास मदत होते. अनशापोटी गूळ खाल्ल्यावर कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असतात.

रक्तदाब नियंत्रणात राहातो : रक्तदाब नियंत्रणासाठी गूळ प्रभावी ठरतो. गुळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आणि फॉस्फरस आढळते. हे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहेत. गुळाबरोबर आले सेवन केल्यास सांधेदुखीपासून मुक्ती मिळते.

रक्त साफ होते : सकाळी अनशापोटी गूळ खाऊन कोमट पाणी प्यायल्यास रक्त स्वच्छ होते. त्यामुळे नवीन रक्त तयार होते. हृदयरोग होण्याचा धोका दूर ठेवण्यासही गुळाच्या सेवनाचा फायदा होता.

शरीराला मिळते ताकद : गुळाच्या नियमित सेवनाने शरीर ताकदवान होते. दिवसभराचा थकवा दूर होण्यासही मदत होते. शरीरात ऊर्जा पातळी कायम राहाते आणि ती कमी होत नाही.

पचनसंस्था मजबूत होते : ज्या लोकांना आहार सहजपणे पचवण्यात अडचणी येतात त्यांनी गूळ आणि गरम पाणी सेवन करावे. या व्यक्तींसाठी ते औषधासारखे कामकरते. त्याचबरोबर बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे, ॲसिडीटीसारख्या समस्यांपासून सुटका होण्यास मदत होते.

'या' चुका टाळल्या तर लग्नात वधूचा मेकअप होणार नाही खराब!

घरात लग्नकार्य असलं की कामाची नुसती लगबग सुरू असते. धावपळ, धांदल असा सगळा माहोल असतो. मात्र अशा वातावरणातही एक आनंद, उत्साह असतो. लग्न म्हणजे दोन जिवांचंच नव्हे तर दोन कुटुंबांचं मीलन असतं. त्यामुळे हा दिवस घरातल्या प्रत्येकासाठी खास असतो. त्यातच वधू-वरांचा थाट तर काही औरच असतो. प्रत्येकाचं लक्ष या दोघांकडेच वेधलेलं असतं. लग्नात आलेल्या पाहूण्यांच्या नजरा, कॅमेरा हे जणू वधू-वरांकडेच केंद्रित झालेले असतात. त्यामुळे लग्नात सुंदर दिसण्यावर या दोघांचाही भर असतो. त्यातच वधू असेल तर विचारायलाच नको. अगदी साड्यांपासून मेकअपपर्यंत प्रत्येक गोष्ट खास असण्यावर तिचा भर असतो. मेकअपमुळे सौंदर्यात भर पडतेच. मात्र बऱ्याच वेळा उत्तम प्रतीच्या मेकअपचं सामान वापरूनही तो मेकअप नीट सेट होत नाही किंवा ऐनवेळी तो खराब दिसून लागतो. हे असं का होतं यामागे बरीच कारणं आहेत. यामध्ये आपल्या बदललेल्या जीवनशैलीचादेखील समावेश आहे.

हेअर कलर : बदलत्या काळानुसार रोज नवनवी ट्रेंड बाजारात येत असतात. सध्या तरुणाईमध्ये हेअर कलर करण्याची क्रेझ दिसून येत आहे. त्यामुळे बऱ्याच तरुणी वेगवेगळ्या रंगांनी केस कलर करत असतात. पण काही वेळेस उत्सुक होऊन केलेला हेअर कलर त्यांचा चेहऱ्याला शोभून दिसत नाही. त्यामुळे लग्नासाठीचा लुक खराब होऊ शकतो. हेअर कलर व्यवस्थित सेटल होण्यासाठी १० ते १५ दिवस लागतात. त्यामुळे लग्नाच्या ४ ते ५ दिवस आधी हेअर कलर केल्यास जो लूक आपल्याला अपेक्षित आहे तो मिळणार नाही. म्हणूनच लग्नापूर्वी जर केस कलर करायचे असतील तर निदान महिनाभर आधी कलर करावेत.

हेअरकट : हेअर कलरप्रमाणे हेअरकट देखील लग्नाच्या ४-५ दिवस आधी करू नये. कधी कधी हेअरकट आपल्याला हवा तसा होतं नाही किंवा तो ब्रायडल लूकला साजेसा नसतो. त्यामुळे लग्नात हेअरस्टाइल करताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महिनाभर आधी हेअरकट केल्यास ते चांगले ठरते.

लग्नापूर्वी सुंदर दिसण्यासाठी केलेले उपाय : लग्नात सुंदर दिसावं ही प्रत्येक तरुणीची इच्छा असते. त्यामुळे बऱ्याच वेळा मुली फेशिअल, ब्लिच, क्लीनअप असे नानाविध प्रकार करतात. पण लग्नाच्या ४-५ दिवसआधी ब्यूटी ट्रीटमेंट करणं नुकसानदायक ठरत. कारण काही मुलींची स्कीन सेन्सिटीव्ह असते, काहींची ड्राय तर काहींची ऑइली असते. त्यामुळे अशा त्वचेसाठी वेगवेगळ्या ब्युटी ट्रीटमेंट असतात. मात्र काही वेळा योग्य प्रोडक्ट किंवा क्रीम न वापरल्यामुळे त्याचा परिणाम चेहऱ्यावर होऊ शकतो. चेहऱ्यावर लाल पूरळ किंवा पुटकुळ्या येऊ शकतात.

अतिरिक्त व्यायाम : लग्नात बारीक दिसावं याकडे मुलींचा जास्त कल असतो. त्यामुळे मुली बऱ्याचदा लग्नापूर्वी डाएट, व्यायाम करतात. तसंच लग्नाच्या १०-१२ दिवस आधी हार्ड वर्कआऊट करतात. परंतु यामुळे त्या थकतात आणि सोबतच चेहरा ही अगदी फिका पडतो.

फास्ट फूड खाणे : लग्नात मेकअपमुळे तर आपलं सौंदर्य वाढतंच मात्र त्याचप्रमाणे चेहऱ्यावर तजेला असणंही गरजेचं आहे. तजेला असेल तरच सौंदर्यात भर पडते. नितळ आणी सतेज चेहरा हवा असेल तर आपल्या आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. या काळात फास्ट फूड खाणं कमी करावं आणि पौष्टीक पदार्थ खाण्यावर भर द्यावा. फास्ट फूड खाल्यामुळे बऱ्याचदा चेहऱ्यावर पिंपल्स येण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो फास्ट फूड टाळावे.

घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

ऋतू बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..

१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.

नारळपाणी

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

मोसंबी आणि पुदिना

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

ब्लॅक चेरी आणि चेरी

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात ॲंटीऑक्सिडेंट आणि ॲंटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

खिऱ्याचे सूप

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

सेबचा सिरका

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. ॲंटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

अननसाचा ज्यूस

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर ॲंटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायदेदेखील मिळतात.

नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक

सकाळच्या नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धूम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.

खरा कोकणी माणूस! रेल्वे अन् एसटीतून प्रवास करत चिपळूणला पोहोचला प्रसिद्ध अभिनेता



मराठी कलाविश्वातील बहुतांश कलाकार हे कोकणातील आहेत. गणपती उत्सव, शिमगोत्सव असो किंवा जत्रा हे सगळे कलाकार आवर्जुन आपल्या गावी पोहोचतात. कलाकारांप्रमाणे मुंबईतील बरेच चाकरमानी सुट्ट्यांमध्ये गावची वाट धरतात. उन्हाळ्याचे दोन महिने कोकण रेल्वेच्या गाड्यांना तुफान गर्दी असते. कलाकार म्हटले की, आलिशान किंवा खाजगी गाड्यांनी गावी जाणार असा समज अनेकांचा झालेला आहे. परंतु, छोट्या पडद्यावरील एक लोकप्रिय अभिनेता याला अपवाद ठरला आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा विनोदी कार्यक्रम आज घराघरांत लोकप्रिय आहे. या मालिकेतील प्रत्येक कलाकाराने प्रेक्षकांचं मन जिंकून घेतलंय. या कार्यक्रमामुळे अनेक नवोदित कलाकार प्रसिद्धीझोतात आले. यापैकी एक म्हणजेच निखिल बने. दरवर्षी सणउत्सवानिमित्त निखिल आपल्या गावी कोकणात जातो. त्याने नुकताच शेअर केलेला एक व्हिडीओ सध्या सर्वत्र चर्चेत आला आहे. निखिल बने चक्क दिवा-सावंतवाडी गाडीच्या गर्दीतून प्रवास करत चिपळूणला पोहोचला. एवढंच नव्हे तर चिपळूणवरून मूळ गावी जाण्यासाठी निखिलने लालपरी अर्थात एसटीने प्रवास केला. यानंतर त्याने व्हिडीओमध्ये त्याचं गावचं घर आणि कोकणातल्या निसर्गसौंदयार्ची झलक नेटकऱ्यांना दाखवली. सध्या निखिलच्या या व्हिडीओवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. ''खरा कोकणी माणूस'', ''जमिनीवर पाय असलेला आमचा चिपळूणकर हिरो'', ''भावा खूप मोठा हो'', ''बने भाऊ तुम्ही किती साधे राहता'', ''तुम्ही एवढे साधेपणाने राहणारे असाल, असं खरंच वाटलं नव्हतं'', ''साधे सरळ सोपे जीवन'' अशा कमेंट्स करत नेटकऱ्यांनी निखिलचं भरभरून कौतुक केलं आहे. तसेच यापुढे सुद्धा असेच व्हिडीओ शेअर करत जा, आम्हालाही तुज्या गावी यायचंय अशी मागणी त्याच्या अनेक चाहत्यांनी या व्हिडीओद्वारे केली आहे.

पोट धरुन हसवणारा 'हसताय ना, हसायलाच पाहिजे'चा BTS व्हिडिओ

गेल्या काही दिवसांपासून अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक डॉ. निलेश साबळे हा खूप चर्चेत होता. संपूर्ण महाराष्ट्राला पोट धरून हसायला भाग पाडणारा हा दिग्दर्शक त्याचा नवाकोरा शो घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. झी मराठीवरील 'चला हवा येऊ द्या'ला रामराम केल्यानंतर निलेश कलर्स मराठी या वाहिनीवर त्याचा नवीन शो 'हसताय ना ? हसायलाच पाहिजे' घेऊन आला आहे. त्याच्या साथीला विनोदवीर भाऊ कदम आणि ओंकार भोजने हेदेखील आहेत.

कार्यक्रमाचा नवा प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल होताच या प्रोमोने प्रेक्षकांची उत्सुकता आणखीच ताणून धरली होती. शोचे प्रोमो, टीझर आणि शीर्षक गीत रीलिज झाल्यापासून सोशल मीडियावर चांगलीच याबद्दल चर्चा सुरू होती. यानंतर अलीकडेच या शोच्या प्रोमोचा बीटीएस व्हिडीओ पोस्ट करण्यात आला. या बीटीएस व्हिडिओवर कमेंट्स आणि लाइक्सचा पाऊस पडला आहे. या व्हिडिओत निलेश साबळे , भाऊ कदम, ओंकार भोजने आणि सुपर्णा श्याम हे कलाकार दिसत आहेत. याशिवाय कलर्स मराठीचे प्रोग्रॅमिंग हेड केदार शिंदेदेखील प्रोमोशूटसाठी हजर होते.

२७ एप्रिल रोजी प्रसारित झालेल्या 'हसताय ना हसायलाच पाहिजे' या कार्यक्रमाच्या पहिल्या एपिसोडला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. या कलाकारांच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर कौतुक केले आहे, तर काहींनी या एपिसोडवर टीकाही केली. या भागात केदार शिंदेंच्या ह्यबाईपण भारी देवा' या चित्रपटाची संपूर्ण टीम पोहोचली होती. ओंकार-भाऊच्या विनोदी स्किटवर ही टीमदेखीलपोट धरून हसत होती. या सोबत अभिनेते भरत जाधव, अलका कुबल यांनीही या एपिसोडमध्ये हजेरी लावली होती.

'हसताय ना? हसायलाच पाहिजे' या शोच्या लेखन आणि दिग्दर्शनांची जबाबदारी निलेश यांचीच असून, भाऊ-ओंकारसह या कार्यक्रमात सुपर्णा श्याम, स्नेहल शिदम आणि रोहित चव्हाण हे कलाकार आहेत. दर शनिवार आणि रविवारी कलर्स मराठीवर हा शो प्रसारित केला जाणार आहे.

दैनिक लोकरक्षणाय सुडोकू - ६९

6			3					9
2		1		4	5	6		
	5	4				8	1	
	3	5		9	4			7
1		7			6			
		2		5				
		3	5	8		7		
						1	9	
	8				1	5		

उत्तर सुडोकू -६८

5	6	3	9	8	1	7	4	2
7	8	4	2	5	3	9	6	1
9	1	2	4	6	7	3	5	8
8	9	5	1	3	4	2	7	6
1	3	6	8	7	2	4	9	5
4	2	7	5	9	6	8	1	3
6	4	9	3	2	5	1	8	7
2	7	1	6	4	8	5	3	9
3	5	8	7	1	9	6	2	4

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

३० एप्रिल

- १४९२: स्पेनने खिस्तोफर कोलंबस यांना त्यांच्या शोधाकायार्साठी कमीशन दिले.
- १६५७: शिवाजी महाराजांनी मोगलांच्या ताब्यात असलेल्या जुन्नर शहरावर हल्ला करून ते लुटले.
- १७८९: जॉर्ज वॉशिंग्टन हे अमेरिकेचे पहिले निवडलेले राष्ट्राध्यक्ष बनले.
- १९३६: वर्ध्याजवळ महात्मा गांधींनी सेवाग्राम आश्रम स्थापन केला.
- १९७७: ९ राज्यांमधील विधानसभा बरखास्त झाली आणि जनसंघ, समाजवादी पक्ष, संघटना कॉंग्रेस आणि भारतीय लोकदल या पक्षांनी जनता पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.
- १९८२: कलकत्त्यात बिजान सेतु हत्याकांड घडले.
- १९९५: उत्तर आयर्लंडला भेट देणारे बिल क्लिंटन हे अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले.
- १९९६: थेऊर येथील श्री चिंतामणी मंदिराच्या आवारातील श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांच्या स्मृतिमंदिराचे उद्घाटन झाले.
- २००९: खायस्लर कंपनीने दिवाळखोरी घोषित केली.
- १७७७: जर्मन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ कार्ल फ्रेड्रिक गाऊस यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १८५५)
- १८७०: भारतीय चित्रपट उद्योगाचे जनक धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी १९४४)
- १९०९: माणिक बंडोजी इंगळे ऊर्फ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑक्टोबर १९६८)
- १९१०: साहित्य अकादमी पुरस्कार विजेते तेलुगू कवी आणि गीतकार श्रीरंगम श्रीनिवास राव ऊर्फ श्री श्री राव यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून १९८३)
- १९२१: जीपीएस चे सहसंशोधक रॉजर एल. ईस्टन यांचा जन्म. (मृत्यू: ८ मे २०१४)
- १९२६: मराठी संगीतकार श्रीनिवास खळे यांचा जन्म. (मृत्यू: २ सप्टेंबर २०११)
- १९८७: भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्मा यांचा जन्म.
- १०३०: तुर्कीच्या गझनवी साम्राज्याचा शासक मोहंमद गझनी यांचे निधन. (जन्म: २ ऑक्टोबर ९७१)
- १८७८: साक्षात्कारी सत्पुरुष व दत्तावतारी स्वामीमहाराज अक्कलकोट यांनी समाधी घेतली.
- १९१३: व्याकरणकार आणि निबंधकार मोरो केशव दामले यांचे निधन. (जन्म: ७ नोव्हेंबर १८६८)
- १९४५: जर्मनीचे नाझी हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर यांनी आत्महत्या केली. (जन्म: २० एप्रिल १८८९)
- २००१: प्रयोग परिवार या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि कृषी शास्त्रज्ञ श्रीपाद अच्युत दाभोळकर यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९२४)
- २००३: मराठी साहित्यिक वसंत पोतदार यांचे निधन. (जन्म: २० नोव्हेंबर १९३९ - आष्टी, उस्मानाबाद)
- २०१४: भारतीय चित्रकार आणि सेट डिझायनर खालिद चौधरी यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९१९)

भविष्य

मेष हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

वृषभ कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४व१५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

मिथुन सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

कर्क अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे

सिंह यंत्र, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं. विचित्र अडचणी आणू शकतो.

कन्या बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

तुला प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपर्कामुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

वृश्चिक फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

धनु उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

मकर आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

कुंभ शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

मीन अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

भाग्याचा दिवस कधी येणार?

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. आरोप-प्रत्यारोपांची डोके उठवणारी आतषबाजी सुरू आहे. भाषेचा शिमगा जोरात आहे. पण मतदानाचा टक्का घसरलेला आहे. १९ एप्रिलला केवळ पहिल्या टप्प्याचेच मतदान झाले आहे. अजून सहा टप्पे बाकी आहेत. पण तरीही २०१९च्या तुलनेत यावेळी मतदानात जवळपास तीन टक्क्यांची घट दिसत आहे. मतदारांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी, त्यांना मतदानाच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने विविध उपाययोजना केल्या आहेत. अगदी सेलिब्रिटींना निवडणूक आयोगाचे दूत बनवून त्यांच्यामार्फत मतदारांना आवाहन, क्रिकेट सामन्यादरम्यान मतदानाबद्दल जागरूकता आणण्याचा प्रयत्न, रेल्वे तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी याबाबत उद्घोषणा यासारखे प्रयत्न निवडणूक आयोगाकडून सुरू आहेत. त्यामुळे उर्वरित सहा टप्प्यांमध्ये तरी मतदारांमध्ये उत्साह दिसेल आणि मतदानाचा टक्का वाढेल, अशी आशा आयोगाला आहे, पण नुसते आवाहन किंवा जनजागृती मोहीम हाती घेऊन उपयोग नाही, मतदानाचा टक्का का घसरत आहे? याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. मुख्य मुद्दा हाच आहे की, मतदारांना समोर आश्वासक असे काही दिसत नाही. महाराष्ट्राच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर, कोणताही राजकारणी भूतकाळाचा फळा पुसून टाकून भविष्याचे काही लिहायला तयार नाही. प्रमुख पक्षाचे नेते भूतकाळातील घटनाच गिरवत बसले आहेत. मग ते शरद पवार असोत, देवेंद्र फडणवीस असोत, अजित पवार असोत, उद्धव ठाकरे असोत किंवा एकनाथ शिंदे असोत! आपले अस्तित्व कसे धोक्यात होते, हे सांगताना सध्या शिळ्या कढीलाच ऊत आणला जात आहे. घासून घासून गुळगुळीत झालेल्या किश्शांबरोबरच आता नवनवीन किस्सेही ऐकवले जात आहेत. अजित पवार हे सकाळच्या शपथविधीची तीच कॅसेट वाजवत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील मागे नाहीत. त्यांनी तर थेट १८ वर्षांपूर्वीचे एका वक्तव्याचे भांडवल केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी राजस्थानमधील बांसवाडा येथे झालेल्या जाहीर सभेत काँग्रेसवर टीका करताना याचा उल्लेख केला होता. काँग्रेस सत्तेवर आल्यास लोकांच्या संपत्तीचे मुस्लिमांमध्ये वाटप करेल. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारने देशाच्या मालमत्तेवर पहिला हक्क मुस्लिमांचा असल्याचे म्हटले होते, असे मोदी यांनी म्हटले आहे. त्याच्या मागचा संदर्भ काय होता, याबाबत मात्र समोरची जनता अंधारातच राहिली. दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही तेच सुरू आहे. शिवसेनेची दुफळी होऊन साधारणपणे दोन वर्षे लोटल्यानंतर नवनवे दावे केले जात आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बंद दाराआडच्या चर्चेनंतर उद्धव ठाकरे यांनी विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ठपका ठेवला आहे. देवेंद्र फडणवीसही म्हणाले होते की, आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री बनवेन आणि मी स्वतः दिल्लीला जाईन. पण त्यांनी मला माझ्याच लोकांसमोर खोटे ठरवले, असा दावा त्यांनी केला. अर्थातच, फडणवीस यांनी हा दावा फेटाळला. एकनाथ शिंदे यांनीही बंडाच्यावेळी आपण वसईतील एका चहाच्या टपरीवरून उद्धव ठाकरे यांना फोन केला होता. त्यावेळी त्यांनी आपल्याला मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली होती, असा दावा केला आहे. मुळात २०२२ मधील सत्तांतरानंतर अनेक गोष्टी समोर आल्या. अर्थातच, लोकांनी त्या गांभीर्याने घेतल्या नाहीत. कारण भाजपचा हाच अजेंडा असल्याची दस्तुरखुद्द 'आरोपतज्ञ' किरीट सोमय्या यांनी कबुली दिली आहे. समोरचा बडा नेता भाजपमध्ये येत नाही, तोपर्यंत त्याच्याशी संबंधित घोटाळ्याची राळ उडवत राहायचे, असे पक्षादेश होते, असे त्यांनी जाहीरपणे मान्य केले आहे. यामागचा तर्क मांडताना किरीट सोमय्या यांनी नाहीतर भाजप संपली असती, असे म्हटले आहे. विशेष म्हणजे, राजकीय वर्तुळातील प्रत्येक लहान-मोठा नेता, आपण आपल्या अस्तित्वासाठी हे पाऊल उचलल्याचे सांगत आहे. पण वास्तवात भ्रटाचारामध्ये एकूण एक नेता बरबटलेला आहे आणि कारवाई करायची झाल्यास सगळे आत जातील. उमेदवारी अर्ज भरताना या नेत्यांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून संबंधित नेत्याने पाच वर्षांत घेतलेली 'कोटीच्या कोटी उड्डाणे' हेच दर्शवते. एकूणच, महायुती किंवा महाविकास आघाडीकडून भूतकाळातील घटनांबद्दल करण्यात येणाऱ्या दाव्यांशी सर्वसामान्यांना काय देणे घेणे आहे? कविवर्य विंदा करंदीकर यांनी 'सब घोडे बारा टक्के' या कवितेत म्हटल्याप्रमाणे 'तुम्ही तरी काय करणार? आम्ही तरी काय करणार? त्याच त्याच खड्ड्यामध्ये पुन्हा पुन्हा तोच पाय, जुना माल नवे शिक्के, सब घोडे बारा टक्के!' एका कार्यक्रमात ही कविता सादर करताना ही कविता अद्याप जिवंत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती. पहिल्या निवडणुकीच्या काळात आपण ही दुर्दैवी कविता तयार केली. वास्तविक प्रासंगिक कविता या संबंधित प्रसंग झाल्यानंतर त्या मरतात, पण ही कविता काही केल्या मरत नाही. म्हणजेच इतक्या वर्षांत इतक्या पक्षांची सरकारे स्थापन झाली, पण सर्वसामान्यांचे प्रश्न आहेत तिथेच आहेत, अशी खंत व्यक्त करतानाच, ही कविता मरेल तेव्हा तो भारताचा भाग्य दिवस असेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली होती. आताची राजकीय परिस्थिती पाहता, ही अपेक्षा सर्वसामान्यांचीसुद्धा आहे, हे नक्की!

प्रचारसभा विचारसभा केव्हा होतील?

लोकप्रिय नेतृत्वाच्या भाषेचे गारूड लक्षावधी लोकांच्या मनावर होत असते. त्यांच्या भाषेची संवगता वा अव्यंग्यता जनमानसाची विचारलिपी होते. आपण कोणते तण पेरतो आहोत, याचा किमान विवेक यायला खरे तर पंच्याहत्तर वर्षे पुरेशी होती, पण आजच्या विखारसभा पहाता तसे एवढ्यात घडेल, असे वाटायला आशेचा झरोका दिसत नाही.

पंच्याहत्तर वर्षाच्या प्रौढ लोकशाहीत अजूनही स्वप्न विक्रेत्याच्या दारुण अहमहमिकेने कंठाळी प्रचार करून जनतेला मतप्रवण करावे लागते हीच गोष्ट दयनीय वाटते. रणरणत्या उन्हात, हजारो ग्रामस्थ आपल्या नेत्यांची वाट पहात आहेत, मुख्य आकर्षण प्रकटण्याआधी ,बेसुमार सुमार स्थानिक नवोदितांची गिरवलेली भाषणे ऐकावी लागत आहेत, प्रमुख चेहरा धुरळा उडवीत निघून गेला की, मनातली असंख्य प्रश्नचिन्हे सांभाळीत उद्याच्या भाषणासाठी पुन्हा नव्या टाळ्या पिटण्यासाठी सज्ज व्हावे लागत आहे. ज्याला 'मतदार राजा' असे गौरवाने म्हटले जाते, त्याचे राजापण असे अगतिक आहे. पंच्याहत्तर वर्षांत फरक एवढाच की, पूवीर्चा हा राजा बैलगाडीतून येत असे, त्याची वाहने आधुनिक झाली, पण परतताना तो रिताच जात आहे. कालौघात पोकळ ठरलेली आश्वासने, नवा वर्ख लावून येण्याचे त्याचे प्रारब्ध टळत नाही.

खापरणजोबा ते खापर पणतू हा प्रवास तसाच तेच खापर घेऊन! आचार नि अभिव्यक्ती यांचा मेळ असावा लागतो, अस्तित्वाचे चंदन करून ते उगाळल्यावर वाणीत सामर्थ्य येते, हे अभंगसत्य पार नाकारणारे, माध्यमातून चेहरा वारंवार दिसतो म्हणून आपण ध्रुव तारा झालो, असा समज झालेले चेहरे, कधीतरी विचार करीत असतील का? आपल्याला मिळणाऱ्या प्रसिद्धीत सिद्धी किती नि तत्कालिकता किती? हजारो जणांना पाच वर्षांसाठी, आम्हीच का? हे सांगताना आपण मतदारानेआधी व्यक्त केलेला विश्वास फलद्रुप केला आहे का? का एकमेकांना पुरते ओळखून असल्यानेच कमालीचे निर्भय झालेले सूत्रधार, हे सारे अचूकवेळी रजनीकालीन प्रीती(भीती) भोजनात, नि मतदार राजाच्या अल्पायुषी स्मरण कोशात मिटून जाणार आहे, हे पूर्वानुभवामुळे माहीत झाल्यामुळे एक थंड बेफिकिरी येत चालली आहे? विचारांचा प्रचार करण्यासाठी शिल्लक काही नसले की मग प्रचाराचा तंत्रविचार करावा लागतो. जनसेवेचे एवढे अधीर कळवळ्याचे इतके असंख्य पाईक पाहिले की माझे मन अनेकदा गहिवरते! जनहितासाठी चाललेली ही अलोट स्पर्धा पाहून वाटते, हे सर्वच एकत्र येऊन गोरगरीबांचे पांग का नाही फेडीत? सर्वांचे उद्दिष्ट केवळ नि केवळ जनसेवा आहे तर मग ही, 'मी करतो तीच जनसेवा,' हा दुराग्रह का? पण ही मरणप्राय कासावीशी असण्याचे कारण वेगळे असल्याने, कुरघोडीचे आपमतलबी कळप तयार होतात. नि त्यातून अधिक उपद्रवमूल्य जोपासणारी विविध नावाची, पण आतील भ्रष्ट उद्दिष्ट असणाऱ्या धनदांडग्या उथळांची भाईगिरी सुरू होते.

आता तसे करण्यापूर्वीचा किमान संकोचही ओसरला आहे. 'हे असेच चालायचे' हे करुण वास्तव इतके बिंबवले आहे की, नीतिमूल्यांचा आचार आपल्या वाणीत असावाच लागतो, असा विचार कुणी मांडला तरी त्याला तत्परतेने मनोरुग्णालयात, वर्गणी काढून पाठवतील. आजचे एकूण चित्र असेच आहे. मग एकंदर भविष्यात आम्हाला जनतेला कोणत्या दिशेने हाकायचे आहे, याचाच विचार करावा लागतो.

जनतेला निरोगी, सुसंस्कृत लोकशाहीसाठी सजग करण्याचा विचार जाऊन, केवळ भूलभुलैय्यात ठेवणे एवढाच आटापिटा होतो. मार्केटिंग होते ते तंत्राचे; दीपवून नंतर काळोख वेढणाऱ्या रोषणाईचे! 'हा असं बोलला, तो तसा बोलला, ती तशी बोलली, ते तसं बोलले, मी बोललोच नाही, आत घडले ते असे होते, बाहेर कळले ते तसे होते' अरे, स्क्रिप्टेड उखाळ्या पाखाळ्या, नंतरच्या धनोमिलनासाठीचे 'सारे आपलेच' हे मनोमिलन नाट्य यांना ही 'मुकी बिचारी कुणीही हाका' अशी जनता विटलेय, हा निरोप या समाज धुरिणांकडे कधी पोहोचणार आहे का? निरपेक्ष वृत्तीने राष्ट्राचा खरोखरीच आंतरिक विकास करण्याचा प्रामाणिक ध्यासच हरवला तर आपापल्या विचारसरणीच्या नेतृत्वाकडे आशेने पाहणाऱ्या व शेवटी एकदाचे मरून जाणाऱ्या जनतेने पाहायचे तरी कोणाकडे? केव्हातरी नक्कीच संपणाऱ्या या सद्दीच्या काळानंतर उरणाऱ्या एकाकीपणात आपण स्वतःला तरी काय उत्तर देणार आहोत?

विचारांनी विचारांशी वाद संवाद न होता, जर वैयक्तिक कुरघोडी, उथळ कुचेष्टा, फुलांच्या वषार्वात मूल्यांचा कचरा, फटाक्यांची कर्णकर्कश आतषबाजी यातच लोकशाही गुंडाळली जात असेल तर मग एवढ्या रणधुमाळीचे प्रयोजन काय?

विचारांची ठेव जवळ नसल्यामुळे प्रचाराची भाषा विवेक सोडून हतबल होते. छातीत धडकी भरवणारी आणि सहजपणे केलेली अपमानजन्य भाषा पुढे नव्या पिढीची सहज प्रवृत्ती होते. थिल्लरपणा, आचरट विनोद यामुळे जिंकल्या, असे वाटलेल्या सभा जनतेला एक तरी संवेदनशील विचार देतात का? हे ऐकून पुढे येणारे उद्याचे नेते कसे असतील? याचा विचार बुजुर्ग मंडळींनी त्वरित करायला हवा. फार तर सभा नाही मनोरंजक होणार, कदाचित सत्तेचे पारडे नाही जड होणार, पण त्या विचारवंत नेत्याला जनता आदरपूर्वक मनात जागा देते. त्याची आठवण चिरंतन उरते, पण मुदलात मुद्दे नसलेला कोरा कागद तासभर बोलत राहतो. प्रसारमाध्यमं हमरीतुमरीचे रंग उधळत राहतात, आणि आपण अजरामर झालो असा समज स्वतःपुरता दृढ केला जातो. तंत्र युगाला बाह्य गतीचा शाप असल्याने तो समज जनता आणि सूत्रधार दोन्ही बाजूंनी लगेचच विरला जातो.

आजही जमलेले लोक, सगळेच काही जमवलेले नसतात. आजचे अतिशय बुद्धिमान नवयुवक मोठ्या उत्साहाने 'सेलिब्रेटी' राजकारणींना ऐकायला येतात. त्यांच्या देहबोलीचे, अभिव्यक्तीचे ते निरीक्षण करतात. लोकप्रिय नेतृत्वाच्या भाषेचे गारूड लक्षावधी लोकांच्या मनावर होत असते, अशा वेळी त्यांच्या भाषेची संवगता वा अव्यंग्यता जन मानसाची विचारलिपी होते. आपण लौकिक अभिलाषेपोटी कोणते तण पेरतो आहोत, याचा किमान विवेक यायला खरे तर पंच्याहत्तर वर्षे पुरेशी होती, पण आजच्या विखारसभा पहाता तसे एवढ्यात घडेल असे वाटायला आशेचा झरोका दिसत नाही.

माझ्या पिढीने गेल्या पन्नास वर्षात विविध संदर्भानी गजबजलेल्या प्रचारसभा भक्तिभावाने अनुभवल्या. जयप्रकाशजी नारायण, एस. एम. जोशी, कॉ. डांगे, यशवंतरावजी चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, रामभाऊ म्हाळगी, मधु दंडवते, अटल बिहारी वाजपेयी, मृणाल गोरे, अहिल्याबाई रांगणेकर यांच्या प्रचारसभांना हजेरी लावली. सभास्थान सोडताना त्यांच्या जीवनमूल्यांनी थरारून जाणाऱ्या पिढीतील आम्ही नागरिक आहोत. आणीबाणी पर्वात विजेसारखी तळपणारी दुर्गा भागवत यांची वाणी असो की, विदूषकही सत्ता उलथवू शकतो हे पु. ल. देशपांडे यांनी टीकेला दिलेले उत्तर असो, त्यात विद्वत्ता रसवत्ता नि आचारांची गुणवत्ता होती. निष्ठा ही प्राणपणाने जपण्याची व जोपासण्याची गोष्ट होती. नेता, तो कोणत्याही पक्षाचा असला तरी तो इतर विचारांच्या मंडळींना वंदनीय वाटत असे.

या वातावरणाचे संस्कार झाले, म्हणूनच बहुदा, मला व माज्यासारख्या अनेकांना अस्वस्थता येत असेल हे वाचून, 'गुरुजी, आता तो काळ गेला, गप्प बसा, आपण कालबाह्य झालात,' असे खेकसून गुमान बसवता येईल नि आम्ही कोणतेही सुरक्षा कवच नसलेली उताराला लागलेली माणसे गप्पही बसू. तेवढेच आमच्या हाती आहे.

पण तरीही चिवट आशेने, कुणीतरी हुंकार देईल या खात्रीने शुभ्र मोटारींच्या वातानुकूलित गाडीच्या ताफ्यातून ऐटीत जाणाऱ्या कुठेतरी या मातीशी असलेल्या नात्याने विचारावेसे वाटते, त्यांनी एकदा, फक्त एकदाच मनाच्या एकांतात स्वतःला विचारावे, 'आपल्याला या मायभूमीने दिलेल्या संधीचे विचारात्मक सार्थक करीत आहोत का? या नश्वर आयुष्याला, स्वच्छ कर्तृत्वाने विचाररूप अक्षर करण्याचा विचार केव्हातरी मनात येतो का? आपण समाजाला कोणत्या दिशेने नेत आहोत, याचा विचार परखडपणे करण्याचा क्षण आपण गाठणार की नाही? आपला हा श्रमिकांचा, शेतकऱ्यांचा देश! त्या देशातील पुढची पिढी तुमच्याकडे श्रद्धेने पहाते आहे, त्यांच्या अनेक स्वप्नांचे आपण शिल्पकार आहात, याची प्रामाणिक जाणीव आपल्या प्रचार विचारात केव्हा प्रतिबिंबित होणार? आपल्याला केवळ भौतिकाचाच विकास हवा आहे की त्याच बरोबर केवळ माणूस हीच एक जात, निसर्ग जोपासना हाच एक धर्म मानणाऱ्या जनतेचा समूह हवाय? की अपरिपक्व टोळीबाज कळप? अर्थात आताच्या रणधुमाळीत या प्रश्नांकडे सराईत दुर्लक्ष होईल, पण केव्हातरी ही धूळ खाली बसेल. चेहरे चेहऱ्यांशी बोलू लागतील. तेव्हा मात्र उत्तर द्या. आज मात्र या प्रश्नांसाठी कुणालाही वेळ नाही हे मला माहीत आहे. तरीही जे वाटते, जाणवते ते व्यक्त करायची वेळ तरी कोणती?

Virender Sehwag's scathing take on R Ashwin's 'mindset': 'Same as KL Rahul saying strike rate is overrated'

Ravichandran Ashwin has been in the news recently for his takes on where T20 cricket is going based on the 2024 Indian Premier League (IPL) and for the fact that he hasn't been among the wickets this season for the Rajasthan Royals. Ashwin has said that he plays as more of a holding bowler for RR than a wicket-taking one and that the latter seems to be becoming increasingly irrelevant in the format. Ashwin had said that technology used by sides seem to indicate that taking wickets is becoming increasingly inferior to containing runs. However, former India batter Virender Sehwag has said that this only reflects Ashwin's mindset and that a bowler who cannot take wickets won't find a place in a team that he is coaching or mentoring. "All his competitors - (Yuzvendra) Chahal, Kuldeep Yadav or anyone else - are getting the wickets. He thinks if he bowls off spin then anyone will hit him. Which is why he bowls his carrom bowl, which is why he is not getting any wickets. Maybe if he believes in his off spin or doosra, he can bag more wickets. But that's his mindset," Sehwag said on Cricbuzz. Ashwin has taken just two wickets this season in eight matches and he has maintained an economy of nine thus far. "But if I were a mentor or a coach of a franchise, I wouldn't think like that. If my bowler is thinking about saving runs and not taking wickets, he won't find a place in the team," he added.

'He may not get picked in the auction next year'

"Sometimes even when you bowl well, you go for 40 runs. Many teams these days use AI and technology and what's emerged out of those is that wicket-taking is becoming irrelevant in T20 cricket. If you look at this IPL wicket-taking is sometimes hampering certain teams," Ashwin had said. Sehwag, however, compared what the veteran spinner said to Lucknow Super Giants captain KL Rahul stating last year the importance of a batter's strike rate in T20 cricket is "overrated". "This is the same as when KL Rahul had said that the strike rate is overrated. Same thing. He said it for batting, Ashwin has said it for bowling that it doesn't matter if you get the wickets. If his stats aren't good, then he may not even get picked in the auction next year. When you pick a bowler, do you expect him to give away 25-30 runs or do you expect him to give you wickets and become man of the match twice or thrice?" said Sehwag.

Delhi high court rejects plea seeking PM Modi's disqualification from contesting polls for six years



NEW DELHI :

The Delhi high court on Monday dismissed a plea seeking to disqualify Prime Minister Narendra Modi from contesting elections for six years for allegedly violating the Model Code of Conduct (MCC) by allegedly seeking votes in the name of "god and place of worship" during his recent speech at Pilibhit, Uttar Pradesh.

The high court said that the plea is devoid of merits.

The court was of the view that the plea was "thoroughly misconceived" since the petitioner had approached the court when the Election Commission was yet to take a call on his representation seeking similar relief.

"Petitioner presupposes that there has been a violation of MCC. This is completely unjustified. The plea being devoid of merits is dismissed," a bench of justice Sachin Datta said in the order.

Recently, the Congress had moved the Election Commission against the prime minister over his 'infiltrator' remark on the Muslims at a poll rally in Rajasthan.

"The Congress manifesto says they will calculate the gold with mothers and sisters, get information about it and then distribute that property. They will distribute it to whom - Manmohan Singh's government had said that Muslims have the first right on the country's assets," Modi had said.

"Earlier, when their (Congress) government was in power, they had said that Muslims have the first right on the country's assets. This means to whom will this property be distributed? It will be distributed among those who have more children. It will distributed to the infiltrators. Should your hard-earned money go to the infiltrators? Do you approve of this?" he added.

The Election Commission had taken cognizance and directed BJP president JP Nadda to ensure that all star campaigners maintain highest level of discourse expected from them.

Supreme Court declines plea seeking postponement of CA exams due to Lok Sabha polls

NEW DELHI :

The Supreme Court on Monday declined a plea to reschedule the Chartered Accountant (CA) exams conducted by the Institute of Chartered Accountants of India (ICAI), which coincides closely with the Lok Sabha election dates in several states. A bench, headed by Chief Justice of India Dhananjaya Y Chandrachud, stated that any alteration in the exam schedule could significantly disrupt the extensive preparations already in place and could potentially harm other students. The exams are scheduled to be held from May 2 to May 17, with specific concerns raised about the exam dates on May 8 and May 14 due to proximate election activities on May 7 and May 13.

Voting for the third phase of the Lok Sabha elections will begin on May 7. The first phase took place on April 19 across 102 constituencies. The second phase was held on April 26 in 89 constituencies

"The scheduling of exams is a matter of policy decisions. Despite considering the importance of the right to vote, the established schedule avoids election dates, and any adjustments now could gravely prejudice the over 4 lakh students enrolled," said the bench, also comprising justices JB Pardiwala and Manoj Misra.

Senior advocate Madhavi Divan, representing some of the CA aspirants, argued that students from remote areas like Kalahandi might face challenges in appearing for exams scheduled immediately after the election days.

She proposed not a wholesale postponement but suggested providing an "opt-out" option for students adversely affected by the schedule or alternatively, increasing the number of exam centres.

"Students from regions requiring extensive travel, especially where public transport is affected by security measures during elections, are at a disadvantage. An opt-out option or more centres could mitigate this," Divan argued.

However, senior counsel Ramji Srinivasan, appearing for the ICAI, opposed any delay or modification to the exam timetable, highlighting the logistical efforts already undertaken, including ensuring that exam dates do not overlap with polling days.

"Adjustments have been made where necessary, with changes to centres for around 3,700 candidates who flagged issues, ensuring no clash with election dates," Srinivasan added.

Ultimately, the top court found favour with the ICAI's submissions, affirming that the current arrangements do not warrant judicial intervention. "The ICAI has demonstrated a careful balance of the exam schedule with the electoral dates. This is not a scenario that necessitates our interference," held the bench, dismissing the appeal against a judgment by the Delhi high court in the matter earlier this month.

दैनिक लोकरक्षणाय लोकशाहीच्या संरक्षणार्थ..

प्रकट निवेदन
रेग्युलेशन ऑफ न्यूज पेपर्स
(सेंट्रल रुल्स १९५६, नियम क्र. ९) अन्वये दैनिक
लोकरक्षणायया वृत्तपत्राची मालकी व इतर तपशीला संबंधी निवेदन

१. प्रकाशन स्थळ : सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाळा नं. ४, तळ मजला, एन. के. इंडस्ट्रियल इस्टेट, आरे रोड च्या समोर, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०००६३.
२. प्रकाशनाचे कालमान : दैनिक
३. मुद्रकाचे नाव : राकेश शंकर गोरे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : १०५/ ए- विंग, पहिला मजला, मा- आशापुरा को. औ. सो. ली. बिल्डिंग नं. ४, गुरुनानक हॉस्पिटल जवळ, बि. के. सी. लिंक रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१
४. प्रकाशकाचे नाव : राकेश शंकर गोरे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : शॉप नं. १२, बी - २, साई धाम शॉपिंग सेंटर, मंगल नगर, १५ नं. लास्ट बस स्टॉप, जी. सी. सी. क्लब जवळ, मिरा रोड (पूर्व) जिल्हा - ठाणे पिनकोड- ४०११०७
५. प्रमुख संपादकाचे नाव : राकेश शंकर गोरे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : रूम नं. ५८१, इमारत क्र. १५ त्रिरत्न को. ऑ. हौ. सो. ली., निर्मलनगर पोलीस ठाणे समोर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१

६.वृत्तपत्राचे मालक असणाऱ्या व्यक्तीचे आणि भागीदाराचे व भांडवलाच्या एका टककयापेक्षा अधिक भाग असणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते : नाही

मी श्री. राकेश शंकर गोरे या अन्वये जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

दि. ३० एप्रिल २०२४

प्रकाशकाची सही
श्री. राकेश शंकर गोरे

ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये यांच्याकडे बाळासाहेबांची शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार राजन विचारे यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल. सोबत पत्नी सौ.नंदिनी विचारे, मुलगी लतिका विचारे, धनश्री विचारे उपस्थित होते.

खासदार राजन विचारे यांनी मॉर्निंग वॉक करत साधला नागरिकांशी संवाद

■ **ठाणे विशेष प्रतिनिधी** : ठाणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांनी ठाण्यामध्ये कोपरी बारा बंगला, विसर्जन घाट, चेंदणी कोळीवाडा, ठाणे स्टेशन पूर्व, अष्टविनायक चौक येथे मॉर्निंग वॉकच्या दरम्यान उपस्थित नागरिकांशी संवाद साधला आणि अष्टविनायक चौक येथील सिद्धिविनायक गणपती मंदिरास भेट देऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यावेळी त्यांच्यासोबत संजय कुलकर्णी, कृष्णकुमार कोळी, प्रदीप शेंडगे, संजय दळवी, अमोल हिंगे, प्रकाश पायरे, दत्ता पागवले, लहू सावंत, गिरीश राजे, जिवाजी कदम, राजेश वायाळ पांडुरंग दळवी, संतोष डंगारे, अनिता प्रभू, स्नेहा भोसले, चेतना साळकर, पौर्णिमा लाड, रंजना शेडगे, ज्योती कोळी, दीपक म्हात्रे, दीपक गोहिल, सारंग कदम, सचिन पागवले, आनंद गुरव, रोहित विधाटे, अशोक जाधव, सुदेश सावंत, अजित पेडणेकर, विनय दळवी, अरुण सोनार, रमेश शिर्के काँग्रेसचे महेंद्र म्हात्रे, स्वप्नील कोळी, भालचंद्र महाडिक, प्रवक्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष श्री शरद पवार गट रचना वैद्य, विधानसभा अधिकारी संतोष मोरे, तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

ओबीसी जनमोचार्चे मल्लिकार्जुन सायबन्ना पुजारे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून 25 ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला

विवाहाच्या फसव्या जाहिरातींपासून सावधान

■ **सरळगाव** : विवाह जमविणाऱ्या मुला-मुलींनी फसव्या जाहिरातीला बळी पडू नका, असे आवाहन वैश्य समाजाचे माजी विश्वस्त नंदकुमार दलाल यांनी एका कार्यक्रमात केले. मुलींची संख्या घटलेली, मुला-मुलींची वाढलेली अपेक्षा यामुळे लग्न जुळवणे कठीण झाल्याचे त्यांनी सांगितले. ही समस्या दूर करण्यासाठी व मुला-मुलींचे विवाह योग्यवेळी होण्यासाठी वधू-वर मेळावे भरवत आहेत. याचा फायदा घेत बोगस विवाह मंडळ स्थापून मुला-मुलींची फसवणूक केल्याचे उजेडात आले आहे. यासंदर्भात नंदकुमार दलाल यांनी सूचित केले की, विवाह जमवायचा आहे या फोन नंबरवर संपर्क करा. अशा जाहिरती प्रसिद्ध होत आहेत. जाहिरातींना बळी पडून मुला-मुलींची आर्थिक फसवणूक झाल्याचे वाचनात येत आहे. विवाह मंडळे फोनवरून संपर्क केल्यानंतर मुला-मुलींची माहिती देतात. दिलेल्या मुला-मुलींचे फोन नंबर व पुढील माहिती देण्यासाठी तीन हजार, पाच हजार रुपये फी भरण्यास सांगतात. आपण या मोहाला बळी पडून पैसे भरल्यानंतर आपला फोन नंबर ब्लॉक करतात, असे दलाल यांनी सांगितले.

नोकरीचे आमिष दाखवून नागरिकांना फसवले

■ **मीरा रोड** : भाईंदर पूर्वेच्या जेसल पार्क येथे चालवत असलेल्या ईगल प्लेसमेंट सर्व्हिसेस नावाच्या कंपनीने समाजमाध्यमातून २०० पेक्षा जास्त लोकांना परदेशात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केली आहे. जेसल पार्क येथे ईगल प्लेसमेंट सर्व्हिसेस नावाची कंपनी सुरू करण्यात आली. कंपनीने समाज माध्यमातून परदेशात नोकरी लावण्याची जाहिरात केली. ती पाहून वेगवेगळ्या राज्यातील शेकडो लोकांनी संपर्क केला. नोकरीला पाठवण्यासाठी व्हिसा व इतर कागदपत्रांसाठी लागणारे पैसे घेतले.काही लोकांना व्हिसा काढून व तिकीट काढून दिले. त्या लोकांनी पैसे जमा केल्यानंतर ते तिकीट रद्द करण्यात आले.

ठाणे शहराला पडला उन्हाचा वेढा!

४२.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद वाढत्या उष्णतेने अंगाची लाहीलाही

■ **ठाणे** : प्रादेशिक हवामान विभागाने शनिवारी पुढील दोन दिवसांसाठी तापमानाचा अंदाज जारी केला होता. यात ठाणे, मुंबई, पालघर विभागात २८ व २९ एप्रिल या दोन दिवसांच्या कालावधीत उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली होती. रविवार, २८ एप्रिलला दुपारी शहरातील तापमानात वाढ होत पारा ४२.६ अंश सेल्सिअसवर पोहोचला होता. वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होऊ लागली. तसेच पुढील काही दिवस उष्णतेचा पारा वाढणार असल्याने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.हवामान खात्याने रविवार आणि सोमवार या दोन दिवसात तापमानात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. कमाल तापमानाचा पारा ३ ते ४ अंशांनी वाढण्याची शक्यता वर्तवली होती. आर्द्रता आणि उष्णता यामुळे प्रत्यक्ष तापमानापेक्षा तापमानाची जाणीव अधिक होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. त्याची अनुभूती ठाण्यात रविवारी जाणवली. रविवारी सकाळी १० नंतर वातावरणात उष्णता वाढू लागली. त्यानंतर दुपारी उष्णता वाढतच गेली. शहरातील तापमान दुपारी एक वाजून ४५ मिनिटांनी ४२.६ अंश सेल्सिअस नोंद झाले. वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होऊ लागली होती. रस्त्यावरून पायी चालणाऱ्या नागरिकांनी डोक्यात टोपी, तर, काहींनी छत्री घेऊन बाहेर पडण्याच्या निर्णय घेतला. तर अनेकांनी थंड पेयांच्या गाड्यांवर आपला मोर्चा वळवला असल्याचे दिसून आले. दरम्यान, वाढत्या तापमानाने ठाणेकर नागरिकांनी रविवार सुट्टीचा दिवस असूनही भटकंतीसाठी बाहेर न पडता घरी एसीत बसून थंडगार हवेत राहणे जास्त पसंत केले. वातावरणातील वाढत्या उन्हाच्या काहिलीमुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

उन्हाच्या बचावासाठी अशी घ्या काळजी

- शक्यतो तीव्र उन्हात दुपारी १२ ते ४ या वेळात घरात राहावे.
- टोपी रुमाल किंवा छत्री वापरावी.
- थेट येणाऱ्या सूर्यप्रकाशाला उन्हाला अडवावे व वातावरण थंड राहिल यासाठी पंख्याचा वापर करण्यात यावा.
- गर्भवती स्त्रिया, वैद्यकीय समस्या असणाऱ्या कामगारांनी उन्हात काम करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.
- पुरेसे पाणी प्या, ताक, लिंबू पाणी, नारळ पाणी असे द्रव्य पदार्थ घ्या.
- सैलसर व सुती कपडे वापर करणे, शक्यतो पांढरे कपडे वापरावेत.

बनावट रेरा प्रकरणातील इमारत अखेर भुईसपाट

■ **कल्याण** : कल्याण-डोंबिवली महापालिकेने बनावट बांधकाम प्रकरणातील आणखी एक इमारत भुईसपाट केली आहे. डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा, गणेशघाट रोड, साईलिला चाळीजवळ बांधकामधारक सुनील नारकर यांनी तळ अधिक सात मजली आरसीसी इमारत बनावट रेरा बांधकाम परवानगीने उभारल्याचे दिसून आले होते.

त्यामुळे ३ ते २२ एप्रिलदरम्यान पालिकेच्या ठेकेदारामार्फत मनुष्यबळाच्या सहाय्याने इमारतीचा वरील भाग तोडण्याची कारवाई करण्यात आली. त्यानंतर पोकलेन मशिनच्या सहाय्यानेअनधिकृत इमारत भुईसपाट करण्यात आली आहे. ही कारवाई पालिका पोलीस अधिकारी, कर्मचारी, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे अधीक्षक अरुण पाटील यांसह ह प्रभागातील कर्मचारी, कामगारांच्या सहकार्याने करण्यात आली.

सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे होतायेत संथ

रस्त्यावर धुळीचे साम्राज्य, नागरिक त्रस्त

■ पालिका प्रशासनाची एकाधिकारशाही सुरू आहे. लोकांना वेठीस धरण्याचे काम प्रशासन करत आहे. पालिकेने मे महिन्याच्या अखेरपर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे पूर्ण करावीत व त्याबाबत महापालिकेचे काय नियोजन आहे ते कळवावे. याबाबत आपण गंभीरपणे पावले टाकली नाहीत तर आपल्या या कारभाराबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करावी लागेल, असा इशारा आ. प्रताप सरनाईक यांनी आयुक्तांना पत्रातून दिला आहे.

■ **मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहरातील रस्त्यातील खड्ड्यांची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी नागरिकांना चांगले रस्ते देण्यासाठी सिमेंट काँक्रीट रस्ते बनवण्याचे काम काही महिन्यांपासून महापालिकेने सुरू केली आहेत. शहरातील काही रस्ते एमएमआरडीए व महापालिका उर्वरित रस्ते सिमेंट काँक्रीटचे करत आहे. परंतु पालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे ही कामे संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. धुळीमुळे नागरिक त्रस्त आहेत. मीरा-भाईंदर महापालिकेने शहरातील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रीट रस्ते बनवण्याची कामे सुरू केली आहेत. रस्ते ठिकठिकाणी खोदलेले आहेत. त्यामुळे शहरात सगळीकडे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. पालिका विलंबाने काम करत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. पावसाळा दीड महिन्यावर येऊन ठेपला असतानाही पालिका प्रशासनाला कोणतेही गांभीर्य दिसत नाही. रस्ते खोदून ठेवल्याने ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. तसेच लोकांना जाण्या-येण्यास त्रास होत आहे. पावसाळ्याच्या आधी कामे पूर्ण करण्याचे पालिकेचे कोणतेही ठोस नियोजन दिसत नाही. त्यामुळे रस्त्यांची सध्या सुरू असलेली कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील की नाही, याबाबत शंका आहे, असे आ. प्रताप सरनाईक यांनी आयुक्तांना पत्राद्वारे विचारणा केली आहे.

आमिष दाखवून महिलेची २५ लाखांची ऑनलाइन फसवणूक

■ **भिवंडी** : ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. असे असतानाच भिवंडी तालुक्यात एका महिलेला ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक करून १०० टक्के नफा कमावता येतो. याचे आमिष दाखवून सुमारे २५ लाख ९५ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी तालुक्यातील माणकोली येथील लोढा अप्पर ठाणे या निवासी संकुलात राहणाऱ्या सुप्रिता प्रदिप चव्हाण यांना फेब्रुवारी ते एप्रिल या दोन महिन्याच्या काळात मार्क बिलसन एलीट प्रॉफीट एक्सचेंज या व्हॉट्सअप ग्रुप मधील मीरा, एसएस एक्वीट्रेड हे ऑप्लिकेशन चालविणारे व फ्रंट एण्ड ऑफ स्टॉक फायनान्स या व्हॉट्सअप ग्रुपमधील सात्वीक यांनी फिर्यादी महिलेशी मोबाइलवर व्हॉट्सअप वरून वेळावेळी संपर्क केला. ब्लॉक ट्रेडींग पैसे गुंतवल्या नंतर १०० टक्के फायदा मिळतो, असे आमिष दाखवले. वेळोवेळी त्यांच्याकडून बँक अकाउंटमध्ये सुमारे २५ लाख ९५ हजार रुपये घेऊन फिर्यादीची ऑनलाइन फसवणूक केली.

४६ क्रमांकामुळे फुटले महागड्या बाईक चोरीचे बिंग

१५० सीसीटीव्ही तपासत चोरट्यास पोलिसांनी केले जेरबंद

■ **कल्याण** : कल्याणच्या कोळसेवाडी पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना तब्बल १५० हून अधिक ठिकाणचे सीसीटीव्ही तपासत एका सराईत बाईक चोरट्याला जेरबंद केले आहे. तेजस उर्फ आकाश मेंगानी असे त्याचे नाव आहे. त्याच्या बाईकवर लिहिलेल्या ४६ या क्रमांकामुळे तो पोलिसांच्या तावडीत सापडला. त्याच्याकडून ३ महागड्या बाईकही पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरातून महागडी बाईक चोरीस गेली. त्यानंतर काही तासातच आणखी एक दुसरी बाईक देखील चोरीला गेल्याची घटना समोर आली. याप्रकरणी कोळसेवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी दिनकर पगारे, पोलीस कर्मचारी सुशील हंडे, तसेच अन्य पोलिसांनी तपास सुरू केला. बाईक चोरट्याला शोधण्यासाठी कल्याण पूर्व आणि पश्चिमेतील सुमारे १५० सीसीटीव्ही तपासण्यात आले. एका सीसीटीव्हीत स्पोर्टस बाईक चालवताना एक तरुण दिसला. मात्र त्याने मास्क घातला असल्याने त्याची ओळख पटत नव्हती. बाईकवर ४६ नंबर लिहिलेला होता. पोलिसांनी काळातलाव परिसरात तपासणी सुरू केली असता त्याठिकाणी ही स्पोर्टस बाईक आढळली. ही बाईक कोणाची आहे, याची चौकशी सुरू केली असता समोर बसलेल्या तरुणाने माझी असल्याचे सांगितले.

■ पोलिसांनी तरुणाची चौकशी केली असता त्याने नाव व पत्ता खोटा सांगितला. मात्र कसून चौकशी केली असता तेजस उर्फ आकाश मेंगानी हे खरे नाव असल्याचे तपासात समोर आले.याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम म्हणाले, तेजस हा सराईत बाईक चोरटा आहे. तो एका गॅरेजमध्ये मेकॅनिक आहे. त्याला बाईकबद्दल सर्व माहिती होती. या कलेचा वापर करून तो काही साथीदारांच्या मदतीने बाईक चोरी करत होता. त्याच्या विरोधात विविध पोलीस ठाण्यांत ९ गुन्हे दाखल आहेत.

अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमानुसारच

■भरणा करण्याचे महावितरणकडून वीजग्राहकांना आवाहन

■ **कल्याण** : महावितरणच्या कल्याण परिमंडलातील वीजग्राहकांना एप्रिल अथवा मे महिन्यात वीजबिलांसोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्यासाठी स्वतंत्र बिल देण्यात येत आहे. ही अतिरिक्त सुरक्षा ठेव नियमानुसार असून त्याचा वीज ग्राहकांनी भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता-२०२१ च्या विनियम १३.१ नुसार वीजग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारण्यात येते. दरवर्षी सुरक्षा ठेवीची पुनर्गणना करण्यात येते. त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीजवापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम निश्चित करण्यात येते. वीजग्राहकांची सुरक्षा ठेव ही मासिक बिल असेल, तेथे सरासरी मासिक बिलाच्या दुप्पट आणि त्रैमासिक असेल तेथे सरासरी त्रैमासिक बिलाच्या दीडपट घेण्याची तरतूद आयोगाकडून करण्यात आली आहे.

उदा. एका ग्राहकाचा एकूण वार्षिक वीज वापर ३६०० रुपये असेल. तर या ग्राहकाने सरासरीनुसार दोन महिन्याचे बिल म्हणजेच ६०० रुपये सुरक्षा ठेवीपोटी महावितरणकडे भरणे बंधनकारक आहे. त्यानंतरच्या आर्थिक वर्षात या ग्राहकाचा वार्षिक वीज वापर ४२०० रुपये झाल्यास ठरलेल्या सूत्रानुसार व सरासरीप्रमाणे सुरक्षा ठेवीची रक्कम ७०० रुपये होईल. संबंधित ग्राहकाचे ६०० रुपये पूर्वीच जमा असल्याने त्याला सुरक्षा ठेवीपोटी वीज कंपनीकडे फक्त १०० रुपये अतिरिक्त भरावे लागतील. सुरक्षा ठेवीच्या अतिरिक्त रकमेचा भरणा करण्यासाठी नियमित वीजबिलाशिवाय स्वतंत्र बिल ग्राहकाला दिले जाते.

- विनियम १३.११ नुसार ग्राहकाने भरलेल्या सुरक्षा ठेव रकमेवर रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित दरानुसार व्याजाची रक्कम (एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ साठी व्याजाचा दर ६.७५ टक्के आहे) वीजबिलाद्वारे समायोजित करून वीजग्राहकांना अदा करण्यात येते.
- लघुदाब वीजग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम घरबसल्या भरण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व महावितरणच्या मोबाईल ॲपवर सुविधा उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या बिलाची रक्कम भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

समाजापर्यंत साहित्य पोहोचवणारे साहित्य सम्राटचे कार्य : कवी. ठोकळे

■ **विशेष प्रतिनिधी** :

अंतरीच्या भावना, कवितेचा उमाळा, हृदयाची भाषा ही सामान्य माणसांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी साहित्य सम्राट पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोदजी अष्टुळ यांचे हडपसर सारख्या उपनगरात खूप मोठे कार्य आहे. सुरुवातीला खूप अडचणी आल्या. हडपसर मध्ये साहित्यिक कार्य चालणारच नाही. असे म्हणणाऱ्यांना अष्टुळ यांनी विविध उपक्रमांद्वारे सातत्याने आज पंधरा वर्षात १८३ कवी संमेलने घेऊन सिद्ध केले. ते म्हणतात काळीज असते तिथे कविता असतेच. खऱ्या अर्थाने समाजापर्यंत कविता रुजवण्याचे काम अष्टुळ यांनी केलेले आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. असे गौरवोद्गार प्रसिद्ध कवी दत्तू ठोकळे यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

साहित्य सम्राट पुणे संस्थेने हडपसर येथील नीलकंठेश्वर महादेव मंदिर येथे महामानवांच्या जयंती निमित्त १८३ व्या कवी संमेलनाचे आयोजन केले होते.

यावेळी विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते आणि दिग्दर्शक अर्जुन नोटके उपस्थित होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. नीलकंठेश्वर महादेव मंदिराच्या प्रसन्न वातावरणात महामानवांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या वास्तवादी कविता कवी कवयित्री यांनी कविता आणि गझलांमधून सादर केल्या. यामध्ये दत्तू ठोकळे, अशोक शिंदे, गौरव नेवसे, विनोद अष्टुळ, मेघराज पाटील, सुभाष महाराज बडधे, शारदा बडधे, गुलाबराजा फुलमाळी, नवनाथ तोडकर, उदय बनसोडे, ॲड. राणी गुंबाडे, विजय माने, आनंद महाजन अशा दिग्गज कवी कवित्रींनी वास्तववादी विचारातून रसिक जनांची आणि भक्तगनांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि बहारदार सूत्रसंचालन विनोद अष्टुळ यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉक्टर आनंद महाजन यांनी व्यक्त केले.

कल्याणमध्ये संतप्त भावाची बहिणीच्या पतीला मारहाण

प्रेमविवाहाचे कारण, कल्याण स्थानकातील घटना

■ **कल्याण** : वारंवार विरोध करूनही बहिणीने ड्रायव्हरसोबत लग्न केले. त्यामुळे संतापलेल्या भावाने गुंड पाठवून बहिणीच्या पतीला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना कल्याण रेल्वे स्थानकावर घडली आहे. याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी मारहाण करणाऱ्या सात जणांना अटक केली असून, फरार भावाचा शोध पोलीस घेत आहेत.

उत्तर प्रदेशमधील बस्ती जिल्ह्यात राहणाऱ्या अनुष्का वर्मा नावाच्या तरुणीचे खुदिराम चौधरी या तरुणाशी प्रेमसंबंध होते. तो कामानिमित्त कल्याणजवळील बनेली येथे राहतो. ड्रायव्हरचे काम करतो. दोघांनी सप्टेंबर २०१३ मध्ये लपून प्रेमविवाह केला होता. या विवाहबाबत कुटुंबात कोणालाही माहिती नव्हती. खुदिराम ड्रायव्हर असल्याने अनुष्काच्या कुटुंबीयांचा त्याला विरोध होता. २५ एप्रिल रोजी अनुष्का घरातून अचानक बेपत्ता झाली. नातेवाईकांनी शोध सुरू केला असता ती एका तरुणासोबत झाशीला गेली असून तिथून तिने कल्याणला जाण्यासाठी गोरखपूर एक्स्प्रेस पकडल्याची माहिती अनुष्काच्या कुटुंबीयांना मिळाली. अनुष्काच्या भावाने याबाबत नाशिक आणि मुंबई येथे राहणाऱ्या नातेवाईक आणि मित्रांना माहिती देत अनुष्काला परत आणा असे सांगितले.

अनुष्काच्या भावाचे तीन मित्र नाशिकमधून गोरखपूर एक्स्प्रेसमध्ये घुसले. फोटोच्या आधारे एक्स्प्रेसमध्ये शोध घेतला असता त्यांना अनुष्का दिसली. त्यांनी अनुष्काचा फोटो काढण्याचा प्रयत्न केला. मात्र याचवेळेला खुदिरामने त्यांना फोटो काढताना पाहिले आणि त्याचा जाब विचारला. तोपर्यंत ट्रेन कल्याण रेल्वे स्थानकावर पोहोचली होती. अनुष्काच्या भावाचे आणखी चार मित्र हे कल्याण स्थानकावर गोरखपूर एक्स्प्रेसची वाट बघत होते. ट्रेन रेल्वे स्थानकावर पोहोचताच ६ ते ७ जणांनी अनुष्का आणि खुदिराम यांना घेरले. त्यांनी खुदिरामला बेदम मारहाण केली आणि अनुष्काला आपल्या दिशेने खेचले. या घटनेची माहिती मिळताच कल्याण रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मारहाण करणाऱ्या ७ जणांना अटक केली.